# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई–४०० ००५

**दूरध्वनी:** ०२२–२२१६३९६४/२२१६३९६५ / २२१६३९६९ **ई–मेल:** mercindia@merc.gov.in

**संकेत स्थळ:** www.merc.gov.in


जाहिरात क्र. ०२ / २०२१–२२

## जाहिरात

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० नुसार, आयोगाने, विद्युत लोकपाल (मुंबई) व विद्युत लोकपाल (नागपूर) ही पदे, कार्यालयीन पत्ता अनुक्रमे – ६०६, केशव, बांद्रा–कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०० ०५१ आणि प्लॉट क्र. २७ ते ३०, आर००२, युनिव्हर्सल मेडोज, पुरषोत्तम बाजार नजीक, नवीन स्नेह नगर, वर्धा रोड, नागपूर – ४४० ०१५, भरण्याचे ठरविले आहे.

उच्च न्यायालयाचा सेवानिवृत्त न्यायमूर्ती किंवा सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, शासनाचे सेवानिवृत्त सचिव किंवा समकक्ष अधिकारी, किंवा विद्युत क्षेत्रातील कंपनीचा सेवानिवृत्त कार्यकारी संचालक पदाच्या किंवा समकक्ष किंवा त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांमधून किंवा त्याच्या समकक्ष दर्जाच्या अन्य कोणत्याही व्यक्तिंकडून अर्ज मागविण्यात येत आहेत आणि त्यांस वर विनिर्दिष्ट केलेल्या पदाचा किमान तीन (३) वर्षांचा अनुभव असावा. इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या संकेत–स्थळावर अपलोड केलेल्या विहित नमुन्यात संपूर्ण तपशिलासह सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५, यांचेकडे पोस्टाने किंवा कुरियरमार्फत, ०७.०१.२०२२ रोजी **संध्याकाळी** ५ .०० वाजेपर्यंत मिळतील अशा रीतीने पाठवावेत. त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

अर्जाचा विहित नमुना, तसेच या पदाचे वेतन, नियुक्तीच्या इतर अटी व शर्ती संबंधातील तपशीलासाठी कृपया आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत–स्थळाला भेट द्यावी.

**दिनांक: १७.१२.२०२१**
**स्थळ: मुंबई**

**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**